REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# ग्रामीण साहित्यातील राजकारणाचे चित्रण

**प्रा. डॉ. शिवाजी नी. नागरे**
**शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला.**



स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागातील राजकीय व्यवस्था स्वयंपूर्ण होती. गावातील पाटील, कुळकर्णी, जमिनदार व्यवस्थापक होते. ग्रामीण समाज हा या राजकीय नेत्यांच्या नेतृत्वाखाली सुखी नसला तरी समाधानाने नांदत होता. गावातील सर्व ग्रामवासी एकत्र बसून बहुमताने निर्णय घेत. अव्वल इंग्रजी कालखंडात या गावठी अधिकाऱ्यांकडे अनेक अधिकार आलेत. बोटावर मोजण्याइतके इंग्रज या गावठी अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांना वतनदार, जमीनदार, जहागिरदार, देशमुख अशा विविध पदव्यांच्या लालचीने शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त शेतसारा वसूल करुन तो शासन दरबारी जमा करायला लावीत. जनता त्यांच्याच भरवशांवर असे. हे नियुक्त व्यक्ती स्वत:ला अधिकारी समजून आपल्याच जनतेचा छळ करीत. याला कंटाळलेले खेडी आपल्यावरील अन्यायी शासनव्यवस्थेचा केव्हा खातमा लागतो, याचाच विचार करीत होती.

१९२० मध्ये गांधीजीचा राजकारणात प्रवेश होऊन त्यांच्या नेतृत्वात राजकीय लढ्याची सुरुवात झाली. गांधीजींनी हा लढा प्रभावी व्हावा याकरीता ग्रामीण भागातील जनतेची मदत घेतली. खेड्याच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगती नाही, हे जाणून 'खेड्याकडे वळा' हा संदेश दिला. जनतेचा विश्वास व वैचारिक पाठवळ गांधीजींच्या लढ्याला प्राप्त झाले. स्वातंत्र्याचा लढा जनआंदोलनात परिवर्तीत होत गेला.

राजकारण्यांच्या व धर्ममार्तंडाच्या अन्यायाला काची पडलेल्या ग्रामीण समाजाने स्वातंत्र्य लढ्यात हिरीरीने सहभाग घेतला. सर्वांच्या प्रयत्नांनी १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. ग्रामीण विकासाकरीता पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमाने खेड्याला अग्रस्थान मिळाले. खेड्यात पंचायत राज्य आले. पण याचबरोबर घराघरात राजकारणही घेऊन आले. राजकारणाचे खेड्यापासून केंद्रस्तरापर्यंत विभाजन झाले. ग्राम-तालुका-जिल्हा-राज्यसरकार व केंद्रसरकार अशी एक साखळीच तयार झाली. सत्तेच्या विभाजनामुळे गावठी राजकाणाच्या अन्यायी परंपरेला काहीसा पायबंद बसला. तरीही शेतकऱ्यांचे व शेतीशी निगडीत सर्व घटकांचे शोषण यामुळे थांबू शकले नाही. छोटा शेतकरी आणि मजूर वर्ग सरकारी योजनांपासून सतत वंचित राहिला. पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण विकासाच्या योजना आखतांना जो ग्रामीण माणसाचा सर्वांगिण विकासाचा उद्देश अपेक्षित होता तो पूर्ण होण्याऐवजी गावातील बडे शेतकरी, जमीनदार, वतनदार, बागायतदार व पुढारी यांनाच त्याचा भरपूर लाभ झाला. ज्याच्यासाठी या योजना होत्या त्यांच्यापर्यंत पोहचल्याच नाही. विठ्ठल वाघ यांनी 'म्हैस' या कवितेत या योजनांचे फसवेपण उघड केले.

> 'म्हैस आटाळ्या पायाची फटाळ्या शिंगाची
> निघाली म्हणतात राजधानीऊन
> सांगत रायते मोठा
> गावात अजून वसान गोठा,
> आहे टुकनी लागेल खुंटा. [१]

शासकीय योजना खेड्यात पोहोचण्यापूर्वीच रेतीत पडलेल्या पाण्यावाणी रस्त्यातच मुरुन जातात. याला राजकीय व्यवस्थेचे भ्रष्टपण कारणीभूत आहे. असे जे वाघ सुचवितात ते बरोबर आहे. ग्रामीण साहित्यिकांच्या पहिल्या, दुसऱ्या पिढीच्या लेखकांनी जे ग्रामीण राजकारणाचे चित्रण केले ते उथळ व वरवरचे आहे. ते उपऱ्या आयुष्यावर आधारलेले लेखन आहे. या संदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात, ''सांगोवांगी,

वर्तमान पत्रातुन ज्या ग्रामीण राजकारणाचे संवंगपणाने एकांगी दर्शन घडविले त्यातून ज्यांना जे कळले ते तेवढेच खेडे पहिल्या पिढीच्या काही लेखकांनी आपल्या विनोदासाठी वापरलेले दिसते.'' [२]

स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच प्राप्त झालेली स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीनही मूल्यांची धूर्त राजकारण्यांनी खेळी केली. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या पिढीतील निष्ठावान राजकीय कार्यकर्त्यांना बाजूला सारुन नवीन तरुणांची एक नवोदित पिढी राजकारणात आली. त्यांनी पूर्वजांच्या मार्गाचा अवलंब करण्यापेक्षा स्वत: वेगवेगळ्या धूर्त खेळीचा अवलंब करुन सामान्य माणसाला जेरीस आणले. राजकीय स्वार्थाने आपले हात प्रत्येक क्षेत्रात पसरुन त्या त्या क्षेत्राला प्रदूषित करुन टाकले. सहकार क्षेत्रात राजकारण आल्याने हे क्षेत्र भ्रष्टाचाराने पोखरले गेले. तेथे वसुली अधिकारी व सावकार यांनी संगनमताने भ्रष्टाचार सुरु केला. सहकाराच्या नावाखाली या लोकांनी शेतकऱ्याच्या पिळवणूकीचाच धंदा सुरु केल्याचे चित्र 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) या वासूदेव मुलाटे यांच्या कादंबरीतून उमटले आहे.

राजकारणी व सहकारी क्षेत्रातील उच्चपदस्थ व्यक्तिच्या भ्रष्ट नीतीमुळे सहकार क्षेत्राला स्वाहाकाराचे रुप प्राप्त झाले. पंचवार्षिक योजनांमुळे खेड्याचा चेहरा काही प्रमाणात का होईना बदलला. रस्ते, बँक, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, वेगवेगळ्या शासकीय योजना तिथे कार्यान्वित करण्यात आल्या. परंतु त्याचा लाभ सामान्य माणसापर्यंत पोहचू शकला नाही. शेतकरी व श्रमजीवी असलेला सामान्य माणूस या विकासापासून कोसो दूर राहिला. गरिबांच्या अब्रुंवर घाला घालणारी मानवी गिदाडे व रक्त पिपांसू धनधांडगे यांचेच साम्राज्य निर्माण व्हायला लागले.

सध्या शैक्षणिक धोरणानुसार खेडोपाडी शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. मात्र या संस्थांनी जनतेला ज्ञानदान करण्यापेक्षा शिक्षकांना, चपराशांना व बाबूंना नोकऱ्या लावणे, त्यांचा वेळावेळी पगार कापणे, त्यांच्याकडून आगाऊचे राजीनामे लिहून घेणे, खोटीनाटी कागदपत्रे दाखवून राजकीय वर्चस्वाने शाळांना अनुदान प्राप्त करणे, अशा सर्व रावणी कृत्यांनी तेथे हैदोस माजविला. लबाड राजकीय मंडळींनी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचा जणू बाजारच मांडला असल्याचे चित्रण या काळातील कादंबऱ्यातून दिसले आहे. श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' हा कथासंग्रहातील कथांमधून व बैजनाथ कळसे यांनी 'तीन भिंती' (१९९०) या कांदबरीतून शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात घुसलेल्या जातिधर्माचे व पक्षाच्या राजकारण्याचे वास्तव चित्रण केले आहे.

राजकारणाने ग्रामीण भागात धर्मसंघर्ष सुरु करुन आपल्या राजकीय स्वार्थाची पोळी भाजण्याचा वारंवार प्रयत्न केला. श्री. ना. पेंडसे यांच्या एल्गार, कादंबरीतील रघू या ब्राम्हण व दादुमिया या मुस्लिम मित्राच्या प्रेमळ मैत्रीमध्ये तेथील राजकारणामुळे बखेडा उभा राहतो. त्यांचे रुपांतर दंगलीमध्ये होते. बाबाराव मुसळे यांनी 'गुलाल' कथेतून अशाच प्रकारच्या जातीय दंगलीचे चित्रण करतात. आपल्या दैनंदिन जीवनात बंधुभावाने जगू पाहणाऱ्या विविध धर्मिय लोकांमध्ये स्वार्थापायी जातीधर्माच्या भिंती उभ्या करुन संधिसाधू राजकारणी लोक समाजातील स्वच्छ वातावरणाला गढूळ करीत असल्याचे चित्र साहित्यातून उमटले आहे. द.मा. मिरासदार व शंकर पाटील यांनी तर ग्रामीण राजकारणाचा मध्यमवर्गीय नागर मनाच्या मनोरंजनासाठी वापर केला. ग्रामीण सुधारणा, पक्ष, निवडणुका, सरपंच इ. गोष्टी त्यांनी मध्यमवर्गीय नागर मानाच्या मनोरंजनासाठी वापरल्याआहेत. राजकारणाच्या दुष्ट बाजूचा लोकारंजनासाठी उपयोग करतांना त्याला एक सकारात्मक बाजूही असते. याकडे या लेखकांनी दुर्लक्ष केलेले आहे. खेड्यातील राजकारणाचे ग्रामीण सिनेमा व कथा कादंबऱ्यातून जे चित्रण आलेले आहे ते एकांग व केवळ रंजनवादी दृष्टीने आलेले आहे. त्यात गावचा पाटील म्हणजे बाई, बाटलीचा शौकीन, रंगेल, कावेबाज व धूर्त असेच जे चित्रण आहे ते सरासर सगळ्याच राजकीय नेतृत्वावर त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणारे आहे. नरहर कुरुंदकर यांच्या मते, लोकशाहीच्या प्रक्रियेत आपले महत्व व प्रतिष्ठा गमावून बसलेला मध्यम वर्ग सर्व ग्रामीण नेतृत्वाकडे आणि खेड्यातील राजकारणाकडे तुच्छतेने पहात असतो.''[३] यावरुन स्वातंत्र्योत्तर कालीन ग्रामीण लेखकांच्या पहिल्या पिढीतील साहित्यिकांच्या लेखनाचा हेतू राजकारणातील नैतिकता मूल्यांची घसरण व त्यामुळे ग्रामीण जनतेत निर्माण होणाऱ्या समस्या रेखाटण्याचा नसून मध्यम वर्गीय शहरी वाचकांचे मनोरंजन करण्याचाच आहे. आनंद यादव यांनी स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कथेबद्दल केलेले विधान या विषयाची पृष्टी करणारे आहे. '१९६० ते १९८० मधील ग्रामीण कथा भडक, नाट्यपूर्ण, घटना, बाई, बाटली, राजकाणांच्या भानगडी, चटपटीत आणि चटकदार संवाद, विनोदी किस्से, ग्रामीण भाषेचा प्रदर्शनासारखा वापर यातच गुरफटलेली आहे.'[४]

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या शिक्षण सुविधांमुळे दलित तरुण शिकू लागले. तत्कालीन साहित्यातून उमटलेले आपल्या जीवनाचे चित्रण पाहून त्यांना निराशा झाली. साहित्याची चीडही आली. लोकशाहीत सामान्य मानसाला आत्मबळ मिळाले. येथून एका नव्या संघर्षाची सुरुवात झाली. अन्यायग्रस्त माणसे, अत्याचारी राजकीय शक्तीच्या विरोधात आपल्या आत्मसंरक्षणाकरीता लढण्यास सिध्द होऊ लागल्याचे आशावादी चित्र १९६० ते १९७० दरम्यानच्या काळातील कथा-कादंबऱ्यातून दिसू लागले. अण्णाभाऊ साठेंच्या वैर (१९६४) कादंबरीतील येळापूरचा इमानदार नानासाहेब देशमुख दौलतजादासाठी शेतकऱ्यांना कर्ज देऊन एका रात्रीत त्यांच्या जमिनी बळकावतो. त्याच्या अन्यायाचा बदला म्हणून हे अन्यायग्रस्त शेतकरी त्याचा व त्याच्या मुलाचा खून करतात.

अलगुज कादंबरीमध्ये गावातील पाटील मोहित्यांच्या रंगूला मागणी घालतो. परंतु गणू मोहित्याला नकार देतो. त्यामुळे बऱ्याच संघर्षाला त्याला सामोरे जावे लागते. तरीही आता तो संघर्ष पत्करण्याची त्याची तयारी ठेवतो. हे धाडस करण्याची शक्ती त्याच्या अंगी

लोकशाहीनेच आणली आहे. माकडीचा माळ (१९६३) या कादंबरीतील चांदोल येथील इमानदार विलासराव हे चंकू माकडवाल्यांच्या दुर्गाचे अपहरण करण्याचा प्रयत्न करतात. ती त्यांच्या हाती लागत नाही. येम्याबरोबर पळून जाते. वैजयंता कादंबरीतील वैजयंता कंत्राटदार चंदुलालच्या तावडीत सापडत नाही. असे एकंदर गावातील राजकीयांच्या खलकारवायांना आता ही भटक्या, गरीब, मागास , दलित वर्गाची सावजं आता बळी पडत नाहीत. असे आशावादी चित्रण या काळातील ग्रामीण कादंबऱ्यातून आले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून महाराष्ट्र निर्मितीच्या काळापर्यंत ग्रामीण राजकाणाचे जे चित्रण आले आहे त्यात माहितीचा अभाव आहे. वर्तमानपत्रातील बातम्यांच्या वाचनावरुन आपले मत बनवून केलेले ते चित्रण आहे. या वाङ्मयाने मध्यमवर्गीय वाचकांचे मनोरंजन करुन त्यांची शाबासकी मिळवावी या उद्देशाने, वाचलेल्या व ऐकलेल्या गोष्टीत थोडा रंगेल व रंगेलपणाचा, बाई-बाटलीचा मसाला ओतून त्याला अधिक रंगतदारपणा आणण्याचा प्रयत्न अधिक प्रमाणात केला आहे. या लेखनामुळे त्याच्या एकदर लेखनातच तंत्रबध्दता येऊन त्यांचे ग्रामीण लेखन एका विशिष्ट चौकटीतच बंदिस्त झाले. लेखकाला असलेला अनुभवाचा अभाव, भाषिक संकोच, वास्तवाची अपूर्ण माहिती, वर्णनातील दोष, यासारख्या गोष्टींनी हे लेखन संकुचित झालेले आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर ग्रामीण राजकारणाने आणखीच उग्र रुप धारण केले.

निवडणूकामागे होणाऱ्या खर्चाला काही पारावर उरला नाही. राजकारणातील मूल्यांची मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला. जनतेच्या प्रश्नांना व समस्यांना मिटविण्याच्या अटीवर निवडून आलेल्या राजकारण्यांनी पदावर असेपर्यंत आपलीच तुंबडी भरण्याच उद्योग केला. याचे वर्णन करतांना शंकर पाटील म्हणतात -

कळसाचं पाणी पडल्यावर नांदत्या मुलीचा जसा नूर बदलतो
तसा ते (राजकारणी) निवडून आल्यावर त्यांचा
सगळा नूरच बदलतो.[५]

राजकारणात येण्याचा उद्देश पूर्णतः बदलला. पूर्वीच्या राजकारणातील उदात्त मूल्ये लयाला गेली. राष्ट्रभक्ती, समाजसेवा, देशसेवा या पवित्र शब्दांनाही हे लोक रखेल सारखे वागवून घेतात. त्यात पक्षनिष्ठा यासारख्या गोष्टीचेही त्यांना काही महत्व राहिलेले नाही. अलीकडील काळात ग्रामीण राजकारणाने सर्व पातळी ओलांडल्याचे चित्र साठोत्तरीत कथाकादंबऱ्यातून यर्थाथपणे चित्रीत केले. शंकर पाटलांच्या कथेतील खासदार समोर नोकरी मागायला आलेल्या गरीब माणसाला, ज्याचा मुलगा BT मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे त्याला म्हणतो, ''पदव्या आणि क्लास हे पैशाला पासरी आहेत. त्याचं नाव काढू नका, कामाचं बोला.''[६] राजकीय पदाच्या प्राप्तीसाठी कोणतीही शैक्षणिक गुणवत्तेची अट नसल्यामुळे गुणवत्ता धारक व्यक्ती काय असतो, त्याच्या गुणवत्तेची काय किंमत असते याची जाणीव अनेक राजकीय पक्षाच्या नेत्याजवळ असत नाही. राजकारणात कुणी यावे हे काही ठरलेले नाही. त्यामुळे राजकारणात सुशिक्षीत, चारित्र्यसंपन्न, बुध्दिजीवी या माणसांनी येण्यापेक्षा ज्यांच्याजवळ पैसा, शक्ती, सत्ता या प्रकारची ताकद असते तेच राजकारणात प्रवेश करतात. जनतेला मतदानाचा अधिकार आहे. मात्र त्याने यादीतील दहा उमेदवारापैकी कोणत्या तरी एकाला शिक्का मारावा एवढेच त्याचे स्वातंत्र्य सीमित आहे. ही लोकशाही आहे. पण तिला कोंबडीविक्याची लोकशाही म्हणता येईल. नैतिकता, विद्वता, सचोटी, कर्तव्यनिष्ठा यासारख्या मूल्यांना राजकारणात कवडीचे मोल उरलेले नाही. १९७० नंतरच्या राजकारणातील अवमूल्यनाचे चित्र या काळातील कथाकादंबऱ्यातून नेमकेपणाने उमटलेले दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जीवाची बाजी लावणाऱ्या तळमळीच्या कार्यकर्त्यांची स्वार्थसाधू व प्रसिध्दीलोलुप राजकारण्यांकडून कशी अवहेलना होते याचे चित्र नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीतून पहायला मिळते. जगदेव-राजमल सारख्या राजकारण्यांच्या हिणकस कारवायांनी अंधःकारमय झालेले गांधारी खेड्याचे जीव ना.धो. महानोर यांच्या 'गांधारी' (१९७३) कादंबरीतून येते. येथे ग्रामपंचायत, सोसायटीच्या निवडणूका, आपसातले हेवेदावे, भांडणे अशा परिस्थितीत भागवत, लालजीसारख्या माणसांना जगणेही कठीण होते. महानोर म्हणतात, ''गांधारीचे नष्टचर्य थांबू शकत नाही. कारण गांधारीच्या नशिबी दुर्योधनच फार आहेत.''[७]

राजकीय उलथापालथीमुळे गुण्यागोविंदाने वागणारी माणसे आता एकमेकांच्या जीवावर उठतात. राजकारण्यांच्या हस्तक्षेपामुळे समाजातील शांतता दुभंगून गेली असल्याचे चित्र विश्वास पाटलांच्या 'पांगिरा' (१९९०) कादंबरीतून उमटते. राजकारण्यांमुळे सामान्य माणसाचे शोषण होत आले आहे. स्वातंत्र्यात खेड्यात विकासाची गंगा धोऽधो वाहू लागेल अशी जी सर्वसामान्यांना आशा होती तिचा पार बोजवारा वाजला. विकास होणे तर दूर, सामान्य माणसाचे जगणेच दिवसेंदिवस कठीण होत चालले असल्याचे चित्र या काळातील ग्रामीण कथाकादंबरीतून उमटले आहे.

बाबाराव मुसळे यांचा 'अल्पभूधारक' या कथेतील चिंतामन या सामान्य माणसाला पाटलाच्या स्वार्थापायी आपल्या एकुलत्या एका पोरीचा जीव गमवावा लागतो. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतरही अनेक खेड्यातील लोकांना साधे प्यायचे पाणी मिळत नसल्याचे वास्तव चित्र सदानंद देशमुखांनी 'तहान' (१९९८) कादंबरीतून रेखाटले आहे. डॉ.प्रल्हाद बडेर तहान मधील चित्रणाबाबत म्हणातात, ''शासकीय यंत्रणा

नेत्या-महानेत्यापासून गावातल्या सरपंच, तलाठी ते डॉक्टरपर्यंत कशी सडली आहे याचे चित्रण सदानंद देशमुख प्रभावीपणे केले आहे.'' [८] शंकर पाटलांच्या खासदाराची जनसेवा कथेतील खासदार म्हणतो, ''खालपासून वरपर्यंत लिंक असते, भ्रष्टाचाराला सुध्दा सिस्टिम आहे.''[९] यावरुन राजकीय व्यवस्था कशी संपूर्णपणे भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडली आहे याची कबूली स्वतः राजकीय नेताच देतो. आता तर भ्रष्टाचार ही एक परंपराच बनली आहे. निवडणूकीच्या वेळी घरपरत्वे व माणसापरत्वे पैसे देऊन वोटर विकत घेण्यापर्यंत राजकारण्यांची मजल गेली आहे. डॉ. एस. गंभीर म्हणतात - ''वोटर तो चंद सिक्को अथवा शराब की बोतलो से खरीदा जा सकता है | राजनिति का ये सबसे न्युनतम स्तर है |''[१०] आज गावच्या राजकीय सत्तेची सुत्रे गावाबाहेर गेली आहेत. शहरात राहणारी माणसे खेड्यातील राजकारण चालवीत आहेत. पूर्वीच्या कथाकादंबरीतील घटनांचे चित्र आता बदलू लागले आहे. आता पाटील गावच्या हितासाठी प्रयत्न करणारा, गावचे दुःख पाहून त्यांना मदत करणारा, गावाचे नष्टचर्य थांबावे म्हणून राजकारण्यांशी संघर्ष करणारा पाटील आता पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया' (१९८७) कादंबरीत भेटतो. पंजाबराव पाटील बोरकरांच्या गावाची सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात आता राजकीय पुढाऱ्यांचाच अधिक त्याला त्रास होतो. गावातील दारुची दुकाने तो बंद करायला जातो. मात्र ती आमदार, खासदार व मंत्र्यांच्या पार्टनरशिपमध्ये सुरु असतात. गावात टेलिफोन येतो तोच मुळी मटक्याचा आकडा कळावा म्हणून. पोलीस आणि पुढाऱ्यांना खूष ठेवून मांगीलाल (गावचा व्यापारी) गावात काळे धंदे करतो. गावाच्या बरबादीची त्याला पर्वा नाही. अशा परिस्थितीत पाटील गावचे नष्टचर्य थांबावे म्हणून तळतळतो. तो म्हणतो, ''पुढे बसतो तर धुरजळ, मागे बसलो तर उलाय. अन् मधात बसलो तर बैलबुजाळ. असा हा माहोल ! अख्खी जिंदगी अधुनमधून मिजमाशी पळल्यावानी माही अन् ह्या गवाचीही.'' [११] खेड्याचे नष्टचर्य आता गावठी राजकारण्यापेक्षा गावाबाहेरच्याच पुढाऱ्यांनी चालविल्याचे दिसते. पाटलांच्या विधानासंदर्भात डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात, ''सद्यकालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीविषयी (पंजाबराव) त्याने केलेली भाष्ये केवळ उपरोधपूर्ण नसतात तर विचारपरिलुप्त असतात.''[१२] आजचे राजकारण अतिशय पराकोटीच्या गलिच्छ अवस्थेला पोहोचलेआहे. यात शिक्षण घेऊन विविध समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नेत्यांनाही काही वेगळे ठेवता येते असे नाही. खुर्चीची नशा सर्व जाणीव विसरायला लावते. अडाणी असलेल्या खेड्यातील सामान्य माणसालाही आता हे समजत आहे की नेते, पुढारी निवडून आल्यावर समस्याकडे फिरुन पाहात नाहीत. त्यामुळे निवडणूकीच्या वेळीच तो पाहिजे ते मागून नंतर त्यांना भ्रष्टाचारास मोकळे करतो आणि तो वरली मटका खेळायला व दारु प्यायला मोकळा होतो. स्वार्थाच्या राजकारणात सामान्य माणसाला वाट्याला आलेल्या नैराश्यातून तो या अवनत अवस्थेला पोहचला आहे. त्याचे अपयश डॉ. गंभीर मेकेपणाने व्यक्त करतात.

बार बार नेताओ की जीत
और हमारी हार होती है |
यहां वोटर के मुह मे
जिसकी शराब होती है || १३

राजकारण हे खाण्यासाठी असते. येथे लोक केवळ खिसे कापण्यासाठीच एकत्र येतात. धनदांडगे व दादा लोकांचा तो उद्योगच झाला आहे. हा सामान्य माणसाचा राजकारणाबद्दलचा समज आता पक्का झालेला आहे. त्यामुळेच तो ही त्यांच्याकडून फारशा अपेक्षा ठेवत नाही. मिळेल त्यात आजचा दिवस आनंदात घालवतो. बळी तो कानपिळी, अशी राजकारणाची स्थिती झाली आहे. लोकशाहीचा हा फार मोठा पराभव आहे. आजची लोकशाही पडद्याआडून हुकमशाहीला वाव देऊ लागली आहे. या संघर्षाचे चित्र या काळातील कथाकादंबऱ्यातून उमटले आहे. अलीकडच्या काळात शेतकऱ्यांची, बहुजनांची मुले राजकारणात जाऊन पदे मिळवू लागली. मात्र त्याच्यावरही भ्रष्टाचारी छाया पडायला फार काळ लागला नाही. सामान्य माणसाच्या दुःखाशी त्याच्या प्रश्नांशी कोणालाच काही घेणे देणे उरलेले नाही. डॉ. एस.गंभीर म्हणतात, ''आज के नेताओ को सामान्य व्यक्तिओं की भुखमरी, पिडा, दुःख कष्ट की चिन्ता नही है, वे तो आत्मसुख में लीन है, जनता के आगे वे मात्र दिखावा करते है | आत्म प्रशंसा से लिन रहते है | इनके आदर्श खोखले है | यदी कोई इन पर अंगुली उठाता है तो उसकी अंगुली काट दी जाती है |''[१४]

ग्रामीण भागाच्या या दुर्दशेला राजकारणाइतकेच इतरही अनेक घटक जबाबदारआहेत. या घटकाचाही साहित्यिकांनी शोध घेणे आवश्यक आहे. तसेच राजकारणात आजही काही निव्वळ समाजसेवेच्या हेतुने काम करणारे लोक आहेत. त्यांच्या आदर्शलाही समोर आणणे साहित्याचेच कार्य आहे. आधुनिक काळात एकूणच सामाजिक जीवनात आत्मकेंद्री, स्वार्थी व संधिसाधू वृत्तीचे पदार्पण झाले आहे. माणसामध्ये घुसलेला चगळवाद, ऐहिक सुखोपभोगाची लालसा सर्व तऱ्हेचा भोगवाद याला कारणीभूत आहे.

## निष्कर्ष :-

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्यातून आलेले राजकारणाचे चित्रण उथळ व वरवरचे आहे.

२) १९६० ते ८० या काळातील ग्रामीण राजकारणांची झालेला नैतिक ऱ्हास, बळावलेला पराकोटीचा स्वार्थ, प्रसिध्दीलोलुपता इत्यादिचे चित्रण साहित्यातून यथार्थपणे आले आहे.

३) स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागातील राजकारणाचे वास्तव चित्र उमटले आहे.

**संदर्भ :-**


१) वाघ, डॉ. विठ्ठल : काया मातीत मातीत, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८१, पृ.क्र. ३४.
२) यादव, आनंद : ग्रामीणता आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८१, पृ.क्र. ५५.
३) कुरुंदकर, नरहर : वानवळा, प्रस्तावना पृ.क्र, १४.
४) यादव, आनंद : ग्रामीणता आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८१, पृ.क्र. १३६.
५) पाटील, शंकर : जुगलबंदी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ.क्र. १०५.
६) तत्रैव, पृ.क्र. १०७.
७) महानोर, ना.धो. : गांधारी, रविराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६, पृ.क्र. ४०.
८) बडेर, डॉ. प्रल्हाद : साप्ताहिक सकाळ, साहित्य अकादमी विजेत्या लेखकांच्या कादंबऱ्या दि. १२ जाने. २००५ पृ.क्र. १६.
९) पाटील, शंकर : जुगलबंदी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ.क्र. १११.
१०) गंभीर, डॉ. एस. : साठोत्तर हिंदी काव्य में राजनितिक चेतना : चुनाव की राजनिति एवं साहित्यिक भ्रष्टाचार, पृ.क्र. १६.
११) बोरकर, पुरुषोत्तम : मेड इन ईंडिया, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ.क्र. १.
१२) ठाकूर, रविंद्र : ग्रामीण मराठी कादंबरी,मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती नोव्हे १९९३,पृ.क्र. १३०.
१३) गंभिर, डॉ. एस. : साठोत्तर हिंदी काव्य में राजनितिक चेतना : चुनाव की राजनिति एवं साहित्यिक भ्रष्टाचार, पृ.क्र. १६.
१४) गंभिर, डॉ. एस. : साठोत्तर हिंदी काव्य में राजनितिक चेतना : चुनाव की राजनिति एवं साहित्यिक भ्रष्टाचार, पृ.क्र. ८४,८५.